राष्ट्रोत्थानाय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

**अतितात्काळ- कालमर्यादा दिनांक २३/०३/२०२२**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/२०२२/ 1380

दिनांक - 22 MAR 2022

प्रति,

संचालक/ प्राचार्य/उपसचिव,

१.शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

२.महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट ॲड केटरिंग टेक्नोलॉजी,पुणे

३.शासकीय तंत्रनिकेतन,अवसरी

४.शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी

५.अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे

६.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ विभागीय कार्यालय,पुणे

७.शासकीय तंत्रनिकेतन,कराड

८.शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड

९.शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड

**विषय – महाराष्ट्र विधान मंडळ महिला व बालकांचे हक्क कल्याण समिती पालघर,रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगांव,पुणे,सातारा,परभणी,नांदेड,लातूर,यवतमाळ इ.जिल्हयांचा अभ्यास दौरा ...**

संदर्भ- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०२२/४२ दिनांक ०१/०२/२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील नमूद महाराष्ट्र विधान मंडळ महिला व बालकांचे हक्क कल्याण समिती यांच्या पुणे व सातारा जिल्हयांतील दौ-यांचे अनुषंगाने शासनाच्या पत्रासोबत जोडलेल्या प्रश्नावलीनुसार व विवरणपत्रानुसार सविस्तर माहिती तयार करावी.

सदर माहिती Sakal Marathi font मधे तयार करुन माहितीची Softcopy est.ropune@gmail.com वर आजच मेल करावी. तसेच सदर माहितीची हार्डकॉपी व्दिप्रतीत या कार्यालयांस दिनांक २३/०३/२०२२ रोजी खास दुतामार्फत पाठविण्याची कार्यवाही करावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ

**पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२२/ ४२**  दिनांक : 01 FEB 2022

ईमेलद्वारे

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती

**विषय : महाराष्ट्र विधान मंडळ महिला व बालकांचे हक्क कल्याण समिती पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगांव, पुणे, सातारा, परभणी, नांदेड, लातूर, यवतमाळ इ. जिल्हयांचा अभ्यास दौरा..**

**संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र.१४/साशि २, दि.२५.०१.२०२२**

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र पहावे. त्वरित संदर्भासाठी पत्राची सहपत्रांसह प्रत सोबत जोडली आहे.

प्रस्तुत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळ महिला व बालकांचे हक्क कल्याण समितीचा पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगांव, पुणे सातारा, परभणी, नांदेड, लातूर, यवतमाळ इ. जिल्हयांचा अभ्यास दौरा प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर दौऱ्यामध्ये महिला व बालांकांच्या कल्याणार्थ राबविण्यात येत असलेल्या योजना, त्यांच्या अटी व शर्ती, विविध योजनांतर्गत पूर्ण झालेली, सुरु असलेली कामे, त्यांना केंद्र व राज्य शासन तसेच अन्य वित्तीय संस्थांकडून करण्यात आलेली आर्थिक तरतूद, प्राप्त झालेला निधी, प्रत्यक्ष झालेला खर्च, अखर्चित रक्कम, लाभार्थी, प्राप्त झालेल्या तक्रारी, लेखापालांचे आक्षेप व त्यावर केलेली कार्यवाही इ. बाबींच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्रासोबतच्या प्रश्नावलीनुसार व विवरणपत्रानुसार जिल्हानिहाय सविस्तर माहिती संकलित करुन सॉफ्ट कॉपीसह दि. ०२.०१.२०२२ पर्यंत सादर करावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
22 MAR 2022
२०४८

( वर्षा संदीप गुजरे )
सहाय्यक संचालक(तां.),
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :
कार्यासन क्रमांक ४, ४अ, ७, ९, १२, १४, १५ व १६, मुख्य कार्यालय, मुंबई

# महाराष्ट्र शासन

Email : hemant.pathak@nic.in

संकीर्ण -२०२२/प्र.क्र. १४/साशि-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई
दिनांक :- २५.०१.२०२२.

प्रति,

१. संचालक , उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र विधानमंडळ महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती पालघर, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, जळगाव, पुणे, सातारा, परभणी, नांदेड, लातूर, यवतमाळ इ. जिल्ह्यांचा प्रस्तावित अभ्यास दौरा

महोदय,

उपरोक्त विषयांकित अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे पत्र क्र. ७२०/मविस/ड-१६, दि. १३.०१.२०२२ रोजीचे पत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र विधानमंडळ महिला व बालकांचे हक्क कल्याण समितीचा पालघर, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, जळगाव, पुणे, सातारा, परभणी, नांदेड, लातूर, यवतमाळ इ. जिल्ह्यांचा अभ्यास दौरा प्रस्तावित करण्यात आला आहे. सदर दौऱ्यामध्ये महिला व बालकांच्या कल्याणार्थ राबविण्यात येत असलेल्या योजना, त्यांच्या अटी व शर्ती, विविध योजनांतर्गत पुर्ण झालेली व सुरु असलेली कामे, त्यांना केंद्र व राज्य शासन तसेच अन्य वित्तीय संस्थांकडून करण्यात आलेली आर्थिक तरतूद, प्राप्त झालेला निधी, प्रत्यक्ष झालेला खर्च, अखर्चित रक्कम, लाभार्थी, प्राप्त झालेल्या तक्रारी,लेखापालांचे आक्षेप व त्यावर केलेली कार्यवाही इ. बाबींच्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या प्रश्नावलीनुसार आढावा घेण्यात येणार आहे.

३. विधानमंडळ सचिवालयाने कळविल्यानुसार प्रश्नावलीनुसार व विवरणपत्रानुसार जिल्हानिहाय माहिती आपण तात्काळ शासनास सादर करावी. तसेच प्रस्तुत जिल्हानिहाय दौऱ्यांचा कार्यक्रम यथावकाश कळविल्यानंतर सदर बैठकांना उपस्थित राहण्याच्या सूचना संबंधीत विभागीय सहसंचालकांना द्याव्यात, ही विनंती.

आपला,

( हे. सु. पाठक )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालय, पनवेल,जळगाव,पुणे,कोल्हापूर, नांदेड, अमरावती.
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती

यांनी प्रस्तावित जिल्हानिहाय बैठकींना उपस्थित राहावे व उपरोक्त नमूद माहिती संचालक यांच्यामार्फत तात्काळ शासनास उपलब्ध करुन द्यावी.

९१५

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ७२० /ई-१६

दिनांक 13 JAN 2022

प्रेषक :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय : **महाराष्ट्र विधानमंडळाची महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती - पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, जळगांव, पुणं, सातारा, परभणी, नांदेड, लातूर, यवतमाळ इ.जिल्ह्यांचा प्रस्तावित** अभ्यास दौरा..

**महोदया,**

निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, जळगांव, पुणे, सातारा, परभणी, नांदेड, लातूर, यवतमाळ इ.जिल्ह्याचा अभ्यास दौरा प्रस्तावित आहे. उपरोक्त दौऱ्याच्या तारखा आपणास यथावकाश कळविण्यात येतील.

सदरहू प्रस्तावित अभ्यास दौऱ्याच्या कालावधीत समिती पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, जळगांव, पुणं, सातारा, परभणी, नांदेड, लातूर, यवतमाळ इ. जिल्ह्यातील **उच्च व तंत्रशिक्षण** विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्रकल्प व कामे इत्यादींना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करणार आहे व तदनंतर संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करणार आहे.

सदर प्रस्तावित अभ्यास दौऱ्यात समिती आपल्या विभागांतर्गत **महिला व बालकांच्या कल्याणार्थ राबविण्यात येत असलेल्या योजना, त्यांच्या अटी व शर्ती, विविध योजनांतर्गत पुर्ण झालेली व सुरु असलेली कामे, त्यांना केंद्र व राज्य शासन तसेच अन्य वित्तीय संस्थाकडून करण्यात आलेली आर्थिक तरतूद, प्राप्त झालेला निधी, प्रत्यक्ष झालेला खर्च, अखर्चित रक्कम, लाभार्थी, प्राप्त झालेल्या तक्रारी, लेखापालांचे आक्षेप व त्यावर केलेली कार्यवाही इ. व तदनुषंगिक सर्व बाबींच्या अनुषंगाने तसेच सोबत जोडलेल्या प्रश्नावलीप्रमाणे सन २०१७-२०१८ पासून आतापर्यंत वर्षनिहाय सविस्तर आढावा घेणार आहे.**

सबब, वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने **जिल्हानिहाय माहितीच्या** ५० प्रती या सचिवालयास ई-१६ (महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती), नववा मजला, कक्ष क्र.९०५, विधान भवन, मुंबई येथे १५ दिवसांच्या आत पाठविण्यात याव्यात. तसेच माहितीच्या सॉफ्ट कॉपीज (वर्ड आणि पीडीएफ स्वरुपात) d16.crww.mls@gmail.com या ई-मेल वर पाठविण्याची कृपया व्यवस्था करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(सही)

(विजय कोमटवार)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

उपसंचालक (नियोजन)
उ.से.
(प्रशा. 2)
3/13.1.22
13/1/22

# महाराष्ट्र विधानमंडळाची महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

सन २०१७-२०१८ पासून वर्षनिहाय सविस्तर माहिती देण्यात यावी.

| अ.क्र | प्रश्न |
|---|---|
| १. | विभागाची रचना व कार्यपद्धती काय आहे, मंजूर पदे, भरलेली पदे, रिक्त पदे तसेच शासकीय, निमशासकीय व शासनानुदानीत संस्थांमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पध्दत इत्यादीबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| २. | महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय क्र.महकस-२००२/प्र.क्र.९६०/का-२, दि.४ मार्च, २००३ अन्वये सरळसेवेद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांपैकी ३०% पदे महिलासाठी आरक्षित ठेवून ती विहित मार्गाने भरण्याबाबत तसेच प्रत्येक सहागाहित केलेल्या संवर्गनिहाय नियुक्त्याचा तपशिल महिलांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांच्या तपशिलासह प्रत्येक सहा महिन्यात महिला व बालविकास विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार गत पाच वर्षात अहवाल पाठविण्यात आला आहे काय व केव्हा ? |
| ३. | विभागातील विविध पदांवर उमेदवाराच्या नियुक्त्या करण्याबाबत सेवाप्रवेश नियमावली तयार केली आहे काय ? त्यास विभागाची मान्यता घेण्यात आली आहे काय? असल्यास, त्याची प्रत देण्यात यावी. |
| ४ | महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय ? असल्यास केव्हापासून ? तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ? |
| ५. | महिलांसाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहेत काय, गत ५ वर्षात समितीला प्राप्त झालेल्या तक्रारी व त्यावर केलेली कार्यवाही. (महिलांची नावे उघड करु नये) |
| ६. | शासकीय/निमशासकीय महाविद्यालये, विद्यार्थी संख्या, महाविद्यालयनिहाय भरलेली पदे, रिक्त पदे, वर्षनिहाय मंजूर अनुदान, वितरित अनुदान, खर्च, अखर्चीत रक्कम, वसतीगृहे, क्षमता, प्रत्यक्ष उपस्थिती, मंजूर अनुदान खर्च, विविध शिष्यवृत्त्या मंजूर अनुदान खर्चीत अखर्चीत रक्कम तसेच बांधकाम इ.बाबतची सविस्तर माहिती विवरणपत्रामध्ये देण्यात द्यावी. |
| ७. | महिला व बालकांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजना/कामे/उपक्रम इ.बाबतची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या **विवरणपत्र अ** मध्ये देण्यात यावी. |
| ८. | लेखापरीक्षण केव्हापर्यंत पुर्ण झाले आहे ? लेखाआक्षेप किती आहेत व त्याची पुर्तता करण्यात आली आहे काय ? प्रलंबित किती आहेत व त्याची कारणे काय आहे? तसेच लेखा आक्षेपानुसार वसूलपात्र रकमा किती आहेत, कोणाकडे आहेत व वसूलीसाठी काय कार्यवाही केली आहे? |
| ९. | गत पाच वर्षातील गैरव्यवहार/अनियमितताबाबतची प्रकरणे आहेत काय त्यांची सद्यस्थिती काय आहे? |
| १०. | गत पाच वर्षात किती तक्रारी प्राप्त झाल्या व त्यावर काय कार्यवाही केली ? |

# विवरणपत्र अ

| अ.क्र. | योजनेचे नांव | २०१७-२०१८ | | | २०१८-२०१९ | | | २०१९-२०२० | | | २०२०-२०२१ | | | २०२१-२०२२ | | | केंद्र/ राज्य हिस्सा | निधी अखर्चित राहण्याची कारणे | निर्धारित उद्दिष्ट | झालेली उद्दिष्ट पुर्ती | एकूण लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्राप्त निधी | खर्चित निधी | अखर्चित निधी | एकूण प्राप्त निधी | खर्चित निधी | अखर्चित निधी | एकूण प्राप्त निधी | खर्चित निधी | अखर्चित निधी | एकूण प्राप्त निधी | खर्चित निधी | अखर्चित निधी | एकूण प्राप्त निधी | खर्चित निधी | अखर्चित निधी | | | | | |
| १. | २. | | ३ | | | ४. | | | ५. | | | ६. | | | ७. | | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

--------